| MHPU240001362000 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | ०६/०५/२००० |
| | नोंदणी दिनांक | : | ०६/०५/२००० |
| | निकाल दिनांक | : | १५/०५/२०२६ |
| | कालावधी | | वर्षे महिने दिवस<br>२६ ०० ०९ |

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे**
**यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : अविनाश म. पाटील)**
(न्यायनिर्णय : दिनांक १५/०५/२०२६ )

**नियमित दिवाणी दावा क्र. ७७/२०००** **निशाणी क्र. १६४/अ**

| | |
|---|---|
| वादी | **१. प्रविण नारायण बो–हाडे,**<br>**(वय १३ वर्षे अ. पा. क. आई वादी क्र. २ आता सज्ञान)**<br>वय : ३१ वर्षे, व्यवसाय : शेती,<br>**२.श्रीमती अलका नारायण बो–हाडे**<br>वय : ४० वर्षे, व्यवसाय : शेती,<br>**३.श्रीमती सिताबाई नारायण बो–हाडे**<br>वय : ५० वर्षे, व्यवसाय : शेती,<br>सर्व रा. शिनोली, ता.आंबेगाव, जि. पुणे. |
| विधिज्ञ | श्रीमती एम. पी. रेघाटे |
| प्रतिवादी | **१. मारुती सखाराम बो–हाडे (मयत), तर्फे वारस**<br>**१अ. श्री. उमेश मारुती बो–हाडे**<br>वय : ४५ वर्षे, व्यवसाय : नोकरी,<br>**१ब. श्री. रमेश मारुती बो–हाडे**<br>वय : ४२ वर्षे, व्यवसाय : नोकरी, |

**१क. श्री. रवी मारुती बो–हाडे**
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय,
**१ड. श्रीमती जनाबाई मारुती बो–हाडे**
वय : ७० वर्षे, व्यवसाय : घरकाम,
१अ ते १ड रा. शिनोली, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**२. सावळेराम खंडू बो–हाडे(मयत), तर्फे वारस**
**२अ. श्री. गुलाब सावळेराम बो–हाडे**
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : शेती,
**२ब. श्री. अनिल सावळेराम बो–हाडे**
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : शेती,
२अ व २ब रा. शिनोली, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**२क. भामाबाई सावळेराम बो–हाडे (मयत) तर्फे वारस** प्रतिवादी क्र. २अ, ब, ड, इ, ई.
**२ड. सौ. मिरा रामदास थोरात**
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,
रा. निघोटवाडी, तपणेश्वर मंदिराजवळ,ता. आंबेगाव, जि. पुणे.
**२इ. सौ. उषा शिवाजी काळे**
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,
रा. काळेवाडी घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**२ई. मंगल अशोक जाधव,** व्दारा अशोक दत्तात्रय जाधव
रा. १०२, मेघनाथ सोसायटी प्लॅट नं. ३१, सेक्टर १५,
कोपरखैराणे, नवी मुंबई.
**३. सावित्राबाई गेनुजी दैने,**
वय : ७८ वर्षे, व्यवसाय : शेती,
रा. वडगाव काशिंबेग, ता. आंबेगाव, जि. पुणे.

**४. चंद्रभागा शंकर गव्हाणे,**
वय : ७० वर्षे, व्यवसाय : घरकाम,
रा. साल, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**५. सुभद्राबाई गोपीनाथ मोढवे,**
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : घरकाम,
रा. साकोरे, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**६. अनुसया दत्तात्रय बो–हाडे, (मयत)** तर्फे वारस प्रतिवादी क्र. ७
**७. बाळू दत्तात्रय बो–हाडे,**
वय : २५ वर्षे, व्यवसाय : शेती,
**८. अनुसयाबाई गोविंद खिलोरे (मयत),** तर्फे वारस
**८अ. श्री. जयसिंग गोविंद खिलोरे,**
वय : ५० वर्षे, व्यवसाय : मजूरी,
**८ब. श्री. मुरलीधर गोविंद खिलोरे,**
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : मजूरी,
८अ व ब रा. खिल्लारवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**९. सुशिला मंगेश सोनावणे,**
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : शेती,
**१०.श्री. दिलीप भिकू बो–हाडे,**
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : शेती,
**११. श्री. महेश भिकू बो–हाडे,**
वय : २५ वर्षे, व्यवसाय : शेती,
९ ते ११ रा. शिनोली, ता. आंबेगाव, जि. पुणे
**१२. संगिता दिनकर सैद,**
वय : ३१ वर्षे, व्यवसाय : घरकाम,
रा. गिरवली, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**१३. नंदा भिकू बो–हाडे,**

| | |
|---|---|
| | वय : २२ वर्षे, व्यवसाय : घरकाम,<br>रा. शिनोली, ता. आंबेगाव, जि. पुणे.<br>**१४. जिजाबाई भिकू बो–हाडे,**<br>वय : ५५ वर्षे, व्यवसाय : घरकाम,<br>**१५. श्री. संतोष नारायण बो–हाडे,**<br>वय : २० वर्षे, व्यवसाय : शेती,<br>रा. शिनोली, ता. आंबेगाव, जि. पुणे.<br>**१६. मंदा शंकर थिटे,**<br>वय : ३५ वर्षे, व्यवसाय : शेती,<br>रा. खराडी, थिटेवस्ती, पुणे ४११ ०१४<br>**१७. नंदा भरत पोखरकर,**<br>वय : २२ वर्षे, व्यवसाय : घरकाम,<br>रा. खडकी, (पिंपळगाव), ता. आंबेगाव, जि. पुणे. |
| **विधीज्ञ** | **प्रतिवादी क्र. १ व ७ तर्फे श्री. आर. एन. अंबटकर.**<br>**प्रतिवादी क्र. २अ ते २ई तर्फे श्री. व्ही. बी. पोखरकर.**<br>**प्रतिवादी क्र. ३, ५, ८अ, ८ब, ९ ते १४ एकतर्फा.**<br>**प्रतिवादी क्र.४ तर्फे एम. के. वळसेपाटील.**<br>**प्रतिवादी क्र. ६ मयत नाव कमी केले.**<br>**प्रतिवादी क्र. १५ ते १७ श्री. एन. डी. जाधव.** |

| | |
|---|---|
| दावा दाखल दिनांक | ०६/०५/२००० |
| मुद्दे निश्चीती दिनांक | ०२/०३/२०१५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०२/०३/२०१५ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | – |
| न्यायनिर्णय दिनांक | १५/०५/२०२६ |

## वादीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| वा.सा. | साक्षीदारांची नांवे | निशाणी क्र. | साक्षी प्रकार |
|---|---|---|---|
| १ | अलका नारायण बो–हाडे | ९२ | वादी क्र. २ स्वतः |
| २ व ४ | नामदेव बाबुराव गोरे | १११ व १२१ | वादी क्र. २ चा भाऊ |
| ३ | प्रविण नारायण बो–हाडे | ११७ | वादी क्र. १ स्वतः |
| ५ | जीवन तुळशिराम फाले | १२३ | पोलीस पाटील |

## प्रतिवादीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| प्र.सा. | साक्षीदारांची नांवे | नि. क्र. | साक्षी प्रकार |
|---|---|---|---|
| १ | गुलाब सावळेराम बो–हाडे | १२६ | प्रतिवादी क्र. २अ स्वतः |

## न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | निरंक | – |

## वादीतर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १ | १००/पी.१ | मौजे शिनोली येथील जमीन गट क्र. ४३ चा ७/१२ उतारा. |
| २ | १०१/पी.२ | मौजे शिनोली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र. २२अ आकारणी यादीचा उतारा. |
| ३ | १०२/पी.३ | मौजे शिनोली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र. २२ब आकारणी यादीचा उतारा. |

| | | |
|---|---|---|
| ४ | १०३/पी.४ | गट क्र. ४३ चा ७/१२ उतारा. |
| ५ | १०४/पी.५ | घर मिळकत ३७ चा उतारा. |
| ६ | १०५/पी.६ | घर मिळकत ३६ चा उतारा. |
| ७ | १०६/पी.७ | घर मिळकत ३८ चा उतारा. |
| ८ | १२१/पी.८ | भूमीअभिलेख चौकशी अधिकारी यांच्याकडील जुना मालमत्ता क्र. ३०९ चा नोंदवही उतारा. |
| ९ | १२२/पी.९ | एकत्रीकरणाचे पत्रक. |
| १० | १२३/पी.१० | फेरफार क्र. ३९७१ ची सत्यप्रत. |
| ११ | १२४/पी.११ | सन १९८९–९० ते १९९७–९८ मधील गट क्र. ४३ चा ७/१२ उतारा. |
| १२ | १२५/पी.१२ | सन १९६४–६५ ते १९७४–७५ मधील गट क्र. ४३ चा ७/१२ उतारा. |
| १३ | १२६/पी.१३ | सन १९७६–७७ ते १९८६–८७ मधील गट क्र. ४३ चा ७/१२ उतारा. |
| १४ | १२९/पी.१४ | मौजे शिनोली येथील खाते क्र. २०४ चा ८–अ उतारा. |
| १५ | १३०/पी.१५ | गट क्र. ४९७ चा ७/१२ उतारा. |
| १६ | १३१/पी.१६ | गट क्र. ४९१ चा ७/१२ उतारा. |
| १७ | १३२/पी.१७ | गट क्र. ४३ चा ७/१२ उतारा. |

## मान्य केलेली कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

## प्रतिवादी क्र. २अ तर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १ | १०७/डी.१ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. ११ चा ८ चा उतारा. |
| २ | १०८/डी.२ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२अ चा ८ चा उतारा. |
| ३ | १०९/डी.३ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२ब चा ८ चा उतारा. |
| ४ | ११०/डी.४ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २३अ चा उतारा. |
| ५ | १४७/डी.५ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. ३६ चा ८ चा उतारा. |
| ६ | १४८/डी.६ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२अ ८ चा उतारा. |
| ७ | १४९/डी.७ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. ११ चा ८ चा उतारा. |
| ८ | १५०/डी.८ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. ३८ चा ८ चा उतारा. |
| ९ | १५१/डी.९ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. ३७ चा ८ चा उतारा. |
| १० | १५२/डी.१० | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२ चा ८ चा उतारा. |
| ११ | १५३/डी.११ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२अ चा ८ चा उतारा. |

| | | |
|---|---|---|
| १२ | १५४/डी.१२ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२ब चा ८ चा उतारा. |
| १३ | १५५/डी.१३ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२ चा ८ चा उतारा. |
| १४ | १५६/डी.१४ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२अ चा ८ चा उतारा. |
| १५ | १५७/डी.१५ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२ब चा ८ चा उतारा. |
| १६ | १५८/डी.१६ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२क ८ चा उतारा. |
| १७ | १५९/डी.१७ | मौजे शिनोली येथील घर मिळकत क्र. २२क ८ चा उतारा. |

**न्यायालयातर्फे देण्यात आलेले निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | निरंक | – |

## :: <u>न्या य नि र्ण य</u> ::

( दिनांक १५/०५/२०२६ रोजी घोषीत)

दावा सरस निरस मानाने वाटपाकरीता केलेला आहे.

**<u>दावा मिळकतीचे वर्णन</u>**

अ. मौजे शिनोली, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील मिळकती–

| अ. क्र | गट क्र. | क्षेत्र | आकार | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हे. – आर | रू. – पैसे | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १ | ४३ | ० – ०२ | ०– ०८ | ग. नं. ४४ | रस्ता | गावठाण | ग. नं.४२ |

ब. मौजे शिनोली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र. २२ अ ही पुर्व पश्चिम २२ फुट दक्षिण उत्तर २४ फुट एकुण क्षेत्रफळ ५२८ चौ. फुट दगड, वीट, मातीत बांधकाम सागवान रायवळ लाकूड, सिमेंट दर्जा मंगलौरी कौलाचे घर.

क. मौजे शिनोली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र. २२ ब ही पुर्व पश्चिम २४ फुट, दक्षिण उत्तर १० फुट एकूण क्षेत्रफळ २४० चौ. फुट दगड, वीट, मातीत बांधकाम सागवान रायवळ लाकूड, सिमेंट दर्जा मंगलौरी कौलाचे घर.

ड. मौजे शिनोली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र. २२ क ही पुर्व पश्चिम २४ फुट दक्षिण उत्तर १२ फुट एकूण क्षेत्रफळ २८८ चौ.फुट दगड, वीट, माती सिमेंट प्लॅस्टर मंगलौरी कौलाचे घर.

या प्रस्तुत दाव्यातील वादातील मिळकती असुन त्यास येथुन पुढे 'दावा मिळकती' असे संबोधण्यात आले आहे.

## वादींचे कथन

२. वादींचे थोडक्यात असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी एकमेकांचे नातेवाईक आहेत. वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. १५ हे सख्खे भाऊ असून प्रतिवादी क्र.

१७ ही त्यांची सख्खी बहिण आहे. त्यांचे वडील मयत नारायण बाबुराव बो–हाडे यांना दोन पत्नी होत्या. पहिली पत्नी वादी क्र. ३ असून प्रतिवादी क्र. १६ ही वादी क्र. ३ हीस नारायण यांचेपासून झालेली मुलगी आहे. वादी क्र. २ ही नारायण बो–हाडे यांची व्दीतीय पत्नी असून तिला त्यांचे पासून वादी क्र. १, १५ व १७ ही मुले झाली आहेत. प्रतिवादी क्र. ३, ४ व ५ या सख्ख्या बहिणी असून प्रतिवादी क्र. २ हा त्यांचा सख्खा भाऊ आहे. प्रतिवादी क्र. ७ हा प्रतिवादी क्र. ९ चा सख्खा भाऊ असून प्रतिवादी क्र. ६ ही त्यांची जनक माता असून ते मयत दत्तात्रय विष्णू बो–हाडे यांचे वारस आहेत. प्रतिवादी क्र. १० व ११ हे सख्खे भाऊ असून प्रतिवादी क्र. १२ व १३ हया त्यांच्या सख्खा बहिणी आहेत व प्रतिवादी क्र. १४ ही त्यांची जनक माता आहे. प्रतिवादी क्र. ८ ही प्रतिवादी क्र. १० ते १४ यांचे वडील मयत भिकू लक्ष्मण बो–हाडे यांची सख्खी बहिण आहे.

३. दावा मिळकती वादी प्रतिवादींच्या वडिलार्जित मालकी वहिवाटीच्या असुन पुर्वी त्या मुळ पुरुष बगूजी बो–हाडे यांचे मालकीच्या होत्या. त्यांचे निधनानंतर त्या बगूजी बो–हाडे यांची तिन्ही मूले नामे रामजी, कृष्णाजी व गोपाळा यांच्या वहिवाटीस आल्या व त्यांचे निधनानंतर दावा मिळकती त्यांचे वारसांच्या नावे आल्या. वादी व प्रतिवादींच्या दरम्यान इतर मिळकतींचे यापुर्वी वाटप झाले आहे. परंतु, दावा मिळकती समाईकांत ठेवल्या होत्या. दावा मिळकतींमध्ये वादी प्रतिवादी क्र. १५ ते १७ यांचा मिळून अविभक्त १/३ इतका हिस्सा असून प्रतिवादी क्र. १ ते ७ व ९ यांचा मिळून अविभक्त १/३ इतका हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. ८ व १० ते १४ यांचा मिळून १/३ इतका हिस्सा आहे.

४. दावा मिळकतीवर वादी प्रतिवादींमध्ये सामंजस्य राहिले नाही. दावा मिळकतीचे उपभोगाबाबत वाद होवू लागले. दावा मिळकत मंचर–भिमाशंकर रस्त्यावर असून त्या चांगल्या किंमतीच्या मिळकती आहेत. वादींना अंधारात ठेवून प्रतिवादी दावा मिळकती विकण्याची भाषा करु लागले. त्यामुळे वादींचे अतोनात नुकसान होवून त्यांचे मालकी हक्का वर गदा येईल. प्रतिवादींचे व्यवहार वादींचे हिताविरुध्द होवू लागल्याने वादीस दावा मिळकती एकत्रात ठेवावयाच्या नाहीत. वादींनी प्रतिवादींकडे दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप मागितले असता, प्रतिवादींनी त्यास नकार दिला. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केला असून दावा मिळकतींचे वाटप होवून मिळण्याची विनंती केलेली आहे.

## <u>प्रतिवादींचे कथन</u>

५. मुळ प्रतिवादी क्र. २ ने निशाणी १६ कडे कैफियत दिली होती. निशाणी क्र. ८८ कडील आदेशाप्रमाणे ती त्याच्या वारसांची कैफियत म्हणून वाचण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यांनी वादी व प्रतिवादींचे वादपत्रात नमूद नातेसंबंध मान्य केले आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, दावा मिळकतीचे वर्णन बरोबर नाही. मुळ पुरुष बगाजी बो–हाडे यांची मुले रानुजी(रामजी), कृष्णाजी व गोपाळा यांच्या दरम्यान दावा गट क्र. ४३ सहीत वडीलोपार्जित सर्व मिळकतींचे त्यांच्या हयातीतच १५० वर्षापुर्वी वाटप झालेले आहे. त्यानंतर ते व त्यांची मुले स्वतंत्रपणे वहिवाट करीत आहेत. गट क्र. ४३ मधील ०.०.०५ गुंठे, गट क्र. ४९१ व ४९७ मधील ४८ गुंठे, गट क्र. ३ मधील ४८.५

गुंठे क्षेत्र वादींना म्हणजेच त्यांचे पुर्वहक्कदार नारायण याच्या वाटणीस आलेली आहे. दावा मिळकत गट क्र. ४३ मधील मिळकत कृष्णाजी बो–हाडे याच्या वाटणीस मिळालेली आहे. कृष्णाजीच्या मृत्यूनंतर त्याचे वारस ती मिळकत वहिवाटतात. दावा मिळकतीत त्यांची ५०–६० वर्षापासून घरे आहेत. ती मिळकत एकत्र कुटुंबाची नाही. वाटप झाल्यानंतर सुध्दा वादींचे नाव मिळकतीस तसेच राहिल्याने त्याचा गैरफायदा वादी घेत आहेत. दावा मिळकतीशी वादींचा संबंध नाही. वादी क्र. २ ही मयत नारायणची दुसरी पत्नी असल्याने व वादी क्र. १ आणि प्रतिवादी क्र. १५ तिच्यापासून नारायण यास झालेली मुले असल्याने ते एकत्र कुटुंबाच्या मिळकतीत हिस्सा मागू शकत नाहीत. म्हणून त्यांनी दावा खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**६.** प्रतिवादी क्र. ४ ने निशाणी ३४ कडे व प्रतिवादी क्र. १५ ते १७ यांनी निशाणी क्र. १९ कडे पुरसिस दाखल करुन दावा मान्य केला आहे. प्रतिवादी क्र. ३, ५, ८अ, ८ब, ९ ते १४ यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला. प्रतिवादी क्र. १ व ७ हे हजर होवून त्यांनी कैफियत दिली नाही. त्यामुळे दावा त्यांच्या कैफियतीविना चालविण्यात आला.

## <u>युक्तीवाद</u>

**७** वादी व प्रतिवादी क्र. २अ ते २ई तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी आपआपल्या कथनाप्रमाणे युक्तीवाद केला. वादीने निशाणी क्र. १४६ लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे. इतर प्रतिवादीतर्फे युक्तीवाद नाही.

## मुद्दे

८. निशाणी क्र. ९१ कडे माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी पुढील प्रमाणे मुद्दे काढलेले असुन त्यावरील निष्कर्ष मी खाली नमुद कारणासाठी नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दावा मिळकती वादी व प्रतिवादींच्या वडीलोपार्जित/एकत्र कुटुंबाच्या आहेत काय? | होय. |
| २. | रानुजी (रामजी), कृष्णाजी व गोपाळा यांच्या दरम्यान ५० ते ६० वर्षापुर्वी वडीलोपार्जित/एकत्र कुटुंबाच्या मिळकतींचे वाटप झाले आहे काय? व ते आपापल्या मिळकतीवर कब्जेवहिवाट करतात काय? | होय, दावा मिळकत वगळून. |
| ३. | प्रतिवादींनी दावा मिळकतीवर घर बांधले आहे काय? | होय. |
| ४. | दावा मिळकतींचे वाटप होवून स्वतंत्र कब्जा मिळण्यास वादी पात्र आहेत काय? | होय. |
| ५. | आदेश व हुकूमनामा काय ? | दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो. |

### –: **का र ण मि मां सा** :–

**मुद्दा क्र. १ व २ बाबत –**

९. उभयपक्षकारांना मान्य असल्याप्रमाणे, त्यांचा मुळ पुरुष बगूजी बो–हाडे हा होता. त्यास रामजी, कृष्णाजी व गोपाळा ही होती. ती तिघे मुले मयत असून त्यांना वादी व प्रतिवादी हे, वादपत्रात नमूद वंशवेल प्रमाणे, वारस आहेत. दावा मिळकत सोडून अन्य

सर्व वडीलोपार्जित व एकत्र कुटुंबाच्या मिळकतींचे वाटप रामजी, कृष्णाजी व गोपाळा यांच्या हयातीतच झालेले आहे. ही तथ्ये उभयपक्षकारांना मान्य असून त्याबाबत त्यांच्यामध्ये दुमत नाही.

**१०.** वादींच्या कथनानुसार दावा मिळकती या पुर्वीच्या त्या वाटपावेळी समाईकातच ठेवल्या होत्या व त्यांचे अद्याप वाटप झालेले नाही. याउलट, प्रतिवादींच्या कथनानुसार त्याचे वाटप पुर्वीच झालेले आहे. वादींनी त्यांचे कथन सिध्द करण्यासाठी वा.सा. क्र. १ ते ५ यांचा तोंडी पुरावा दिलेला आहे. वा.सा.क्र. १ व वा.सा.क्र. ३ यांनी वादपत्रातील कथनांचा पुर्नउच्चार करुन दावा मिळकतींचे वाटप झाले नसल्याचे म्हटले आहे. परंतु, त्यांच्या जबाबावरुन असे दिसुन येते की, वा.सा.क्र. १ ही ही जबाब देतेवेळी म्हणजे सन २०१५ मध्ये ४० वर्षांची होती. तर, वा.सा.क्र. ३ हा जबाब देतेवेळी म्हणजेच सन २०१६ मध्ये २८ वर्षांचा होता. त्यांनी वादपत्रामध्ये कथन केल्याप्रमाणे ते पुर्वीचे वाटप ५०–६० वर्षापुर्वी झालेले आहे. त्यामुळे त्यांची वये पाहता ते वाटप वा.सा.क्र. १ च्या लग्नापुर्वी व वा.सा.क्र. ३ च्या पुर्वीच झाल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे त्याबाबत त्यांना वैयक्तिक माहिती असल्याचे कारण नाही. गट क्र. ४३ ची मिळकत कृष्णाजी व गोपाळा यांच्या हिश्यास देण्यात आली होती किंवा कसे, हे वा.सा.क्र. ३ ला माहिती नाही. तसेच, गट क्र. ४३ मध्ये प्रतिवादी यांनी घरे बांधलेली असून ते त्याची देखभाल करीत असल्याचे दोघांनीही मान्य केलेले आहे. वा.सा.क्र. ४ ने असे सांगितले आहे की, वादींचे पुर्वहक्कदार नारायण बो–हाडे यांनी त्याचा हिस्सा मिळावा म्हणून प्रतिवादीकडे वेळोवेळी

मागणी केली होती व सावळेराम यांनी दिनांक ०२/०५/१९९५ रोजी गट क्र. ४३ मधील नारायणची जागा काढून देईल, असे वा.सा.क्र. ५ च्या समक्ष लिहुन दिलेले आहे. वा.सा.क्र. ४ नामदेव हा वादी क्र. २ चा भाऊ आहे. त्याच्या उलटतपासावरुन असे दिसुन येते की, दावा मिळकतींचे वाटप झाले नसल्याचे त्याला नारायणने सांगितले होते. त्यामुळे ती त्याची ऐकीव माहिती आहे.

**११.** वा.सा.क्र. ५ हा पोलीस पाटील असून त्यानेही नारायण बो–हाडे यांनी त्याचा हिस्सा मिळावा म्हणून प्रतिवादींकडे वेळोवेळी मागणी केली होती व सावळेराम यांनी दिनांक ०२/०५/१९९५ रोजी गट क्र. ४३ मधील नारायणची जागा काढून देईल, असे त्याच्या समक्ष लिहुन दिलेले आहे, असे सांगितलेले आहे. परंतु, तो उलटतपासास हजर राहिलेला नाही. त्यामुळे भारतीय पुरावा कायदयाचे कलम ११४ (जी) अन्वये तो पुरावा त्यांच्या विरुध्दचा होता म्हणून तो उलटतपासासाठी हजर राहिला नाही व वादींनी त्यास हजर ठेवण्यासाठी कोणताही प्रयत्न केला नाही, असे गृहित धरणे उचित होते. त्यामुळे त्याच्या जबाबावर विसंबुन राहता येत नाही. त्यामुळे जरी, वा.सा.क्र. ४ ने सावळेराम यांनी दिनांक ०२/०५/१९९५ रोजी गट क्र. ४३ मधील नारायणची जागा काढून देईल, असे वा.सा.क्र. ५ च्या समक्ष लिहुन दिल्याचे सांगितले असले तरी, त्यावर विसंबुन राहता येत नाही.

**१२.** वादीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, गट क्र. ४३ चा उतारा वादींनी दाखल केलेला असून त्यामध्ये नारायण याचे नाव व त्यानंतर वादींची वारसाने नावे

दाखल आहेत. दावा मिळकत वडीलोपार्जित असल्याचे प्र. सा. क्र. १ गुलाब यांनी उलटतपासात मान्य केलेले आहे. त्यामुळे ती त्यांची नावे एकत्रातच नोंद आहेत. त्या अनुषंगे गट क्र. ४३ च्या उता–याचे (निशाणी १००, १०३, १२४ ते १२६ व १३२) अवलोकन केले असता, त्यामध्ये वादींचा पुर्वहक्कदार नारायण त्याच्या मृत्यूनंतर वादी व प्रतिवादी यांची नावे नोंद असल्याचे सिध्द होते. प्र.सा.क्र. १ च्या उलटतपासावरुन त्याने दावा मिळकती वडीलोपार्जित असल्याचे मान्य केल्याचे दिसुन येते. तसेच, कैफियतीतील व त्याच्या जबाबातील परिच्छेद क्र. ८ब मध्ये दावा मिळकत गट क्र. ४३ मध्ये मयत नारायण याची ०.०.५ गुंठे इतकी मिळकत वाटपात दिल्याचे त्याने मान्य केलेले आहे. यावरुन दावा मिळकत गट क्र. ४३ मध्ये मयत नारायण व त्याचे मृत्यूनंतर वारसाने वादींचा गट क्र. ४३ मध्ये हिस्सा असल्याचे सिध्द होते. त्यामुळे भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम ११५ अन्वये गट क्र. ४३ मध्ये वादींचा हिस्सा नाही, असे म्हणण्यास प्रतिवादींना Estoppel या तत्वाची बाधा येते. जरी, त्या गटाचे पुर्वी वाटप झाल्याचे प्र. सा. क्र. १ ने सांगितले असले तरी, नारायणच्या व वादींच्या हिश्यास किती मिळकत आहे, याची नोंद ७/१२ पत्रकी नाही. यावरुनही वादींच्या कथनास पुष्टी मिळते. या सर्व बाबींचा विचार करता, दावा मिळकत वगळून इतर वडिलोपार्जित मिळकतींचे वाटप झाल्याचे सिध्द झाले असले तरी, दावा मिळकत गट क्र. ४३ मध्ये वादींचा हिस्सा असल्याचे व त्याचे अद्याप सरस निरस मानाने त्यांच्या दरम्यान वाटप झाले नसल्याचे सिध्द होते. म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर 'होय' असे दिले असून मुद्दा क्र. २ चे उत्तर वर

नमुद केल्याप्रमाणे दिलेले आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत –</u>**

**१३.** प्रतिवादी क्र. २ अ ते २ ई तर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत ब ते ड या गट क्र. ४३ मध्ये असल्याचे वादींनी सिध्द केलेले नाही. त्या मिळकती त्यांच्या असून त्यामध्ये त्यांची घरे आहेत. त्यामुळे त्याचाशी वादींचा काही संबंध नाही. याउलट, त्यावर वादीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, निशाणी १२१ कडील भूमीअभिलेख कार्यालयाकडील नोंदवहीचे उता–यावरुन मारुती बो–हाडे याने गट क्र. ४३ मध्ये घरे असल्याबाबत जबाब दिलेला आहे. त्यावरुन वादींचे कथन सिध्द होते. या पुराव्याच्या अनुषंगे निशाणी १२१ चे अवलोकन केले असता, मारुती बो–हाडे यांनी चा. नं. ३०९, ३१५ व ३०९अ या गट क्रमांक ४३ पैकी आहेत, असे चौकशी अधिका–याला सांगितल्याबाबत ती नोंद आहे. परंतु, त्यावरुन दावा मिळकत ब ते ड याचाच चा. नं. ३०९, ३१५ व ३०९अ असल्याबाबत पुरावा अभिलेखावर नसल्याने त्या मिळकती या गट क्रमांक ४३ पैकी आहेत, हे त्यावरुन सिध्द होत नाही.

**१४.** वादींनी दाखल केलेल्या निशाणी १०४ ते १०६ कडील उता–यावरुन दावा मिळकत ब ते ड मध्ये प्रतिवादींची घरे असल्याचे सिध्द होते. परंतु, ती घरे गट क्र. ४३ मध्ये असल्याचे सिध्द होत नाही. परंतु, निशाणी १२६ मधील कैफियतीमधील परिच्छेद क्र. ८क मध्ये दावा मिळकतीवर ५० ते ६० वर्षापुर्वी घरे बांधल्याचे प्रतिवादींनी मान्य केले आहे. त्यावरुन दावा मिळकतीत प्रतिवादींची घरे असल्याचे सिध्द होते. म्हणून मुद्दा

क्र. ३ चे उत्तर 'होय' असे दिले आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत –</u>**

**१५.** दावा मिळकत गट क्र. ४३ मध्ये वादींचा हिस्सा असल्याचे व त्याचे अद्याप सरस निरस मानाने त्यांच्या दरम्यान वाटप झाले नसल्याचे सिध्द झालेले आहे. त्यामुळे त्याचे वाटप होवून मिळण्यास वादी पात्र आहेत. म्हणून मुद्दा क्र. ४ चे उत्तर 'होय' असे दिले आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ बाबत –</u>**

**१६.** उभयपक्षकारांना मान्य असल्याप्रमाणे, त्यांचा मुळ पुरुष बगूजी बो–हाडे हा होता. त्यास रामजी, कृष्णाजी व गोपाळा ही होती. त्यामुळे दावा मिळकत गट क्र. ४३ मध्ये त्या तिघांचा १/३ हिस्सा येतो. रामजी यास हरिभाऊ हा एकमेव मुलगा व हरिभाऊ यास बाबुराव हा एकमेव मुलगा होता. ते दोघे मयत आहेत. बाबुराव यास नारायण हा एकमेव मुलगा असुन त्यास वादी व प्रतिवादी क्र. १५ ते १७ असे वारस आहेत. त्यामुळे नारायण याचा १/३ हिस्सा हा वादी व प्रतिवादी क्र. १५ ते १७ यांना एकत्रात मिळतो. त्यामुळे त्यांचा तो एकत्रीत १/३ हिस्सा तुटक करुन वाटप करुन कब्जात देणेबाबत आदेशीत करणे उचित होते. तसेच, दावा मिळकत गट क्र. ४३ ही महसुली असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ अन्वये हुकुमनामा जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविणे उचित होते. या सर्व बाबींचा विचार करुन वादप्रश्न क्र. ५ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो–

:: **<u>आ दे श</u>** ::

| | |
|---|---|
| अ. | दावा खर्चासह मंजुर करण्यात येतो. |
| ब. | वादी व प्रतिवादी क्र. १५ ते १७ यांचा एकत्रात दावा मिळकत गट क्र. ४३ मधील १/३ हिस्सा तुटक करुन वाटप करुन कब्जात देण्याचा आहे. |
| क. | येणे प्रमाणे हुकुमनामा करणेचा आहे. |
| ड. | दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ अन्वये हुकुमनामा जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्याचा आहे. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PATIL AVINASH MADHUKAR
Date: 2026.05.15 16:11:48 +0530

**[ अविनाश म. पाटील ]**

दिनांक : १५/०५/२०२६

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घोडेगाव.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment are same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Gaurav A. Bobade. |
| Name of Court | : Shri. Avinash M. Patil.<br>Civil Judge Junior Division, Ghodegaon. |
| Dictated and typed on | :15/05/2026. |
| Corrected on | :15/05/2026. |
| Signed on | :15/05/2026. |